Indian Streams Research Journal
Vol.2,Issue.III/April; 12pp.1-4  ISSN:-2230-7850

**Research Papers**

# परभणी जिल्ह्यातील ग्रामीण सेवा केंद्राचे भौगोलिक विश्लेषण

*प्रा.आनंद वळंकीकर,*
सहा.प्राध्यापक,
वै.धुंडा महाराज महाविद्यालय,
देगलूर जि.नांदेड

*डॉ.आप्पाराव काळगापुरे,*
सहा.प्राध्यापक,
श्री.हावगीस्वामी महाविद्यालय,
उदगीर जि.लातूर

*डॉ.सदानंद गोने,*
प्राचार्य,
उज्वल ग्रामीण महाविद्यालय,
घोणसी ता.जळकोट जि.लातुर

प्रस्तावना :

मानव हा सामाजिक प्राणी असून समुह करुन राहण्याची त्याची प्रवृत्ती आहे. मानव समुह तयार करुन राहू लागला त्यातूनच वस्त्या निर्माण झाल्या आहेत. अतिप्राचीन काळी मानव हा प्राथमिक स्वरुपाचे व्यवसाय करत असे. जसजसा मानवाचा विकास होत गेला तसतसा मानवाच्या कार्यामध्ये वारंवार बदल होत गेलेला दिसून येतो. मानव ज्याठिकाणी कायम वस्ती करुन राहत होता. त्या वस्त्यांचा झपाटयाने विकास झालेला आहे. ग्रामीण वस्त्यांचे मुख्य कार्य बदलले आणि त्या ग्रामीण वस्त्यांचे रुपांतर कालानुरुप नागरी वस्त्यांमध्ये झालेले दिसून येते. त्याचबरोबर वस्त्यांच्या कार्यामध्येही बदल झालेला दिसून येतो.

प्राथमिक स्वरुपाच्या आर्थिक व्यवसायाच्या सेवासुविधा हया प्रामुख्याने ग्रामीण वस्त्यामधून पूरविल्या जातात. परंतु वस्त्यांचा जसजसा विकास होत जाईल तसतसा वस्त्यांच्या आर्थिक व्यवसायामध्येही बदल होत जातो. द्वितीय व तृतीय स्वरुपाच्या आर्थिक व्यवसायाच्या सेवा सुविधा हया सर्वसामान्यपणे मोठया ग्रामीण वस्त्यामधून सभोवतालच्या लहान ग्रामीण वस्त्यांना पुरविल्या जातात. अशा मोठया ग्रामीण वस्तीस ग्रामनगर केंद्र असे म्हणतात. प्रादेशिक विकासाच्या दृष्टीने ग्रामनगर केंद्राला विशेष महत्व प्राप्त झालेले दिसून येते. या ग्रामीण वस्तीतील व्यावसायिकांची संख्या अधिक असल्यामुळे तेथील व्यवसायात मोठया प्रमाणात सुधारणा झालेली आहे. अशा ग्रामनगर केंद्राकडून त्याच्या प्रभावाखाली येणाऱ्या वस्त्यांना सेवा सुविधा पुरविल्या जातात. ग्रामनगर सेवाकेंद्रापेक्षा लहान असलेल्या वस्त्या ही काही प्रमाणात विविध प्रकारच्या सेवा पुरवितात. त्यांना ग्रामीण सेवा केंद्र म्हणून ओळखले जाते. असे ग्रामीण सेवा केंद्र शेजारच्या लहान वस्त्यांना सेवा पुरविण्याचे काम करतात.

***अभ्यास क्षेत्र :***

प्रस्तूत शोधनिबंधासाठी परभणी जिल्हा हा अभ्यास क्षेत्र म्हणून निवडला आहे. हा जिल्हा महाराष्ट्राच्या पूर्व विभागातील जिल्हा असून त्याचा 18058' उत्तर ते 19050' उत्तर अक्षवृत्त आणि रेखावृत्तीय विस्तार 76013श पूर्व ते 77012श पूर्व रेखावृत्ताच्या दरम्यान आहे. या जिल्ह्याचे एकूण क्षेत्रफळ 6511 चौ.कि.मी. एवढे असून ते महाराष्ट्र राज्याच्या 2.11 टक्के एवढे आहे. सन 2001 च्या जनगणनेनुसार या जिल्ह्याची एकूण लोकसंख्या 1491109 एवढी असून ती महाराष्ट्राच्या एकूण लोकसंख्येच्या 2.76 टक्के एवढी आहे. या जिल्ह्यात एकूण नऊ तालुके असून 830 ग्रामीण वस्त्या आहेत. अभ्यास क्षेत्रात परभणी, गंगाखेड, पूर्णा, सोनपेठ, पाथरी, मानवत, सेलू, जिंतूर व पालम हे नऊ तालुके आहेत. यातील पालम वगळता सर्व तालुके नागरी वस्त्या आहेत. तर पालम हे तालुक्याचे ठिकाण असूनसुध्दा ते ग्रामीण वस्तीचे ठिकाण आहे. परभणी जिल्हयात एकूण 69 ग्रामीण सेवा केंद्र आहेत. त्याकरिता विविध प्रकारच्या प्राथमिक, दुय्यम व तृतीय सेवा पुरवित असलेल्या वस्त्यांचा समावेश ग्रामीण सेवाकेंद्रामध्ये केलेला आहे. ज्या ग्रामीण वस्तीत विविध प्रकारच्या किमान 9 सेवा पुरविल्या जातात अशा वस्त्या ग्रामीण सेवा केंद्र म्हणून निश्चित केलेल्या आहेत.

***उद्दिष्टये :***

अभ्यास क्षेत्रातील ग्रामीण सेवा केंद्राचे अभिक्षेत्रीय वितरण कसे आहे याचा अभ्यास करणे हे मुख्य उद्दिष्ट डोळयासमोर ठेवून प्रस्तुत शोधनिबंध तयार केलेला आहे.

***अभ्यास पध्दती व माहिती संकलन :***

प्रस्तूत शोधनिबंधासाठी आवश्यक असणारी आकडेवारी दुय्यम स्वरुपाच्या स्त्रोतापासून संकलित केली असून ती परभणी जिल्हयाच्या आर्थिक व सामाजिक समालोचन, जनगणना अहवाल, परभणी जिल्हा गॅझेटियर इ. मधून संकलीत केलेली आहे. संकलीत केलेल्या आकडेवारीवर संस्करण करुन ती तक्त्यात दर्शविण्यात आलेली आहे. ग्रामीण सेवा केंद्र निश्चितीसाठी विविध प्रकारच्या मुख्य पाच सेवा विचारात घेतलेल्या आहेत. त्यात शैक्षणिक सेवा, वैद्यकीय सेवा, आर्थिक सेवा, वाहतूक व दळणवळण सेवा व इतर प्रशासकीय सेवा

**Please cite this Article as :** *डॉ.सदानंद गोने ,प्रा.आनंद वळंकीकर* **and** *डॉ.आप्पाराव काळगापुरे , परभणी जिल्ह्यातील ग्रामीण सेवा केंद्राचे भौगोलिक विश्लेषण* **: Indian Streams Research Journal (April ; 2012)**

यांचा प्रामुख्याने आधार घेतलेला आहे. या सेवांचे तीन गट पाडले असून एकूण 15 प्रकारच्या सेवा विचारात घेतल्या आहेत. या 15 सेवांमध्ये किमान नऊ सेवा देणाऱ्या वस्त्यांचा समावेश ग्रामीण सेवा केंद्रात केलेला आहे. या आधारे परभणी जिल्हयात एकूण 69 ग्रामीण सेवा केंद्र असल्याचे निदर्शनास आले आहे. त्या ग्रामीण सेवा केंद्रातून पुरविल्या जाणाऱ्या विविध सेवांचे माध्य व प्रमाण विचलन काढून त्याआधारे त्याचे चार गटात विभाजन केलेले आहे. त्यावरुन उच्चतम सेवा, उच्च सेवा, मध्यम सेवा व निम्न सेवा देणारी ग्रामीण सेवा केंद्रे निश्चित केलेली आहेत.

***ग्रामीण सेवा केंद्राचे तहसिल निहाय वितरण :***

परभणी जिल्हा या अभ्यास क्षेत्रात एकूण 69 ग्रामीण सेवा केंद्र आढळून येतात. सर्वाधिक ग्रामीण सेवा केंद्र परभणी या तालुक्यात 16 एवढी असून सर्वात कमी ग्रामीण सेवा केंद्र हे सेलू व मानवत तालुक्यात प्रत्येकी चार (04) एवढी आहेत. परभणी तालुक्यानंतर जिंतूर या तालुक्याचा क्रमांक लागतो. जिंतूर तालुक्यात 14 ग्रामीण सेवा केंद्र आढळून येतात. यानंतर गंगाखेड व पूर्णा तालुक्याचा क्रमांक लागतो. या दोन्ही तालुक्यात प्रत्येकी 7 ग्रामीण केंद्रे आढळतात. तर पाथरी आणि पालम या दोन तालुक्यात प्रत्येकी 6 ग्रामीण सेवा केंद्र आढळून येतात. तर सोनपेठमध्ये 5 ग्रामीण सेवा केंद्र असल्याचे दिसून येते.

***तक्ता क्र.1***
***परभणी जिल्हयातील तहसीलनिहाय ग्रामीण सेवा केंद्राचे वितरण***

| तहसील | ग्रामीण सेवा केंद्राची संख्या | ग्रामीण सेवा केंद्राचे नाव |
|---|---|---|
| सेलू | 04 | चिकलठाणा, वालूर, कुप्ता, देऊळगाव गाथ |
| जिंतूर | 14 | वझर बु., वाघी धानोरा, बामणी बु., अंबरवाडी, चारठाणा, सावंगी, म्हाळसा, इटोळी, आडगाव खंडागळे, भोगाव, वस्सा, आसेगाव, बोरी, कौसाडी, दुधगाव |
| परभणी | 16 | आर्वी, पेडगाव, मांडाखळी, झरी बु., साडेगाव, टाकळी बोबडे, पिंगळी, टाकळी कुंभकर्ण, आसोला, जांभ, लोहगाव, शिंगणापूर, उमरी, पोखर्णी, साळापुरी, दैठणा |
| मानवत | 04 | कोल्हा, केकरजवळा, रामेटाकळी, रामपुरी बु. |
| पाथरी | 06 | हदगाव बु., केसापुरी, पाथरगव्हाण, बाभुळगाव, लिंबा, वाघाळा |
| सोनपेठ | 05 | शेळगाव मराठा, कान्हेगाव, नाईकोठा, वडगाव, उखळी बु. |
| गंगाखेड | 07 | धारासूर, म्हादपुरी, माकणी, कोदरी, इसाद, राणी सावरगाव, पिंपळदरी |
| पालम | 06 | पालम, रावराजुरा, फरकांडा, पेठशिवणी, चाटोरी, बनवस |
| पूर्णा | 07 | एरंडेश्वर, अहेरवाडी, कातनेश्वर, चुडावा, कावलगाव, ताडकळस, वझूर |
| एकूण | 69 | |

***स्त्रोत : परभणी जिल्हा जनगणना अहवाल,2001***

ग्रामीण सेवा केंद्राचे प्रथम, द्वितीय, तृतीय व चतुर्थ श्रेणीमध्ये विभाजन करण्याकरिता या ग्रामीण सेवा केंद्रामधून पूरविल्या जाणाऱ्या विविध सेवांचे माध्य (mean) व प्रमाण विचलन (standard deviation) काढलेले आहे. ग्रामीण सेवा केंद्रांचे श्रेणी निश्चितीसाठी सांख्यिकी पध्दतीचा व ग्रामीण सेवाकेंद्रातील विविध सेवांचा आधार घेण्यात आला आहे. परभणी जिल्हयातील सर्वच 69 ग्रामीण सेवा केंद्रात किमान 9 ते कमाल 14 एवढया विविध प्रकारच्या सेवा पुरवित असल्याचे दिसून येते. ग्रामीण सेवा केंद्राच्या या सेवांचे माध्य 12.25 तर प्रमाण विचलन 1.37 एवढे आलेले आहे. या माध्य व प्रमाण विचलन याच्या आधारे ग्रामीण सेवा केंद्राचे विविध श्रेणीमध्ये विभाजन करुन प्रथम श्रेणीमध्ये येणाऱ्या ग्रामीण सेवा केंद्रांना अतिउच्च सेवा देणारी ग्रामीण सेवा केंद्रे म्हणून ओळखली जातात. द्वितीय श्रेणीमध्ये येणाऱ्या ग्रामीण सेवा केंद्रांना उच्च सेवा देणारी ग्रामीण सेवा केंद्र, तृतीय श्रेणीची सेवा देणाऱ्या केंद्रांना मध्यम सेवा देणारी ग्रामीण सेवा केंद्र तर चतुर्थ श्रेणीची सेवा देणाऱ्या केंद्रांना न्यूनतम सेवा देणारी ग्रामीण सेवा केंद्र म्हणून ओळखले जाते. (तक्ता क्र.1)

**Please cite this Article as :** *डॉ.सदानंद गोने ,प्रा.आनंद वळंकीकर* **and** *डॉ.आप्पाराव काळगापुरे , परभणी जिल्ह्यातील ग्रामीण सेवा केंद्राचे भौगोलिक विश्लेषण* **: Indian Streams Research Journal (April ; 2012)**

*अतिउच्च सेवा देणारी ग्रामीण सेवा केंद्र :*

परभणी जिल्हयात अतिउच्च सेवा देणारी ग्रामीण सेवा केंद्राची संख्या 16 एवढी आहे. या ग्रामीण सेवा केंद्रातून सभोवतालच्या परिसरातील छोटया ग्रामीण वस्त्यांना विविध प्रकारच्या किमान 9 ते कमाल 14 सेवा पुरविल्या जातात. अतिउच्च सेवा देणाऱ्या एकूण 16 ग्रामीण सेवा केंद्रांपैकी सर्वाधिक ग्रामीण केंद्र परभणी या तालुक्यात 06 एवढे असून त्यात पेडगाव, साडेगाव, पिंगळी, टाकळी कुंभकर्ण, लोहगाव व दैठणा यांचा समावेश होतो. सर्वात कमी ग्रामीण सेवा केंद्र विविध सहा तालुक्यात प्रत्येकी एक एवढे आढळून येते. यामध्ये सेलू (चिकलठाणा), मानवत (रामपुरी बु.), पाथरी (पाथरगव्हाण), सोनपेठ (वडगाव), पालम (पालम) व पूर्णा (कावलगाव) या तालुक्यांचा समावेश होतो. तर जिंतूर व गंगाखेड या तालुक्यात प्रत्येकी दोन ग्रामीण सेवा केंद्र आढळून येतात. गंगाखेडमध्ये माकणी व राणी सावरगाव या ग्रामीण सेवा केंद्राचा समावेश होतो. तर जिंतूर तालुक्यातील चारठाणा व दुधगाव या ग्रामीण सेवा केंद्राचा अतिउच्च सेवा देणाऱ्या ग्रामीण सेवा केंद्रात समावेश होतो. अतिउच्च सेवा देणारी ही ग्रामीण सेवा केंद्र ही प्रामुख्याने राज्य महामार्ग व लोहमार्ग यांच्याजवळ असलेली आढळून येतात.

*तक्ता क्र.2*
*तहसील व श्रेणीनिहाय ग्रामीण सेवा केंद्राचे वितरण*

| त्हसील | प्रथम श्रेणी $\bar{X}$ 2SD | दुय्यम श्रेणी $\bar{X}$ 1SD | तृतीय श्रेणी $\bar{X}$ 1SD | चतुर्थ श्रेणी $\bar{X}$ 2SD |
|---|---|---|---|---|
| रेलू | 01 | 03 | — | — |
| थ्जंतूर | 02 | 07 | 04 | 01 |
| परभणी | 06 | 08 | 02 | — |
| मनवत | 01 | 01 | 01 | 01 |
| पाथरी | 01 | 03 | 02 | — |
| सोनपेठ | 01 | 03 | 01 | — |
| गंगाखेड | 02 | 03 | 02 | — |
| पलम | 01 | 04 | 01 | — |
| पूर्णा | 01 | 03 | 03 | — |
| एकूण | 16 | 35 | 16 | 02 |

*स्त्रोत : संशोधकाने संकलित केलेल्या माहितीवरुन*

*उच्च सेवा देणारी ग्रामीण सेवा केंद्र :*

उच्च सेवा देणाऱ्या ग्रामीण सेवा केंद्राची संख्या संपूर्ण अभ्यास क्षेत्रात 35 एवढी असल्याचे दिसून येते. या उच्च सेवा देणाऱ्या ग्रामीण सेवा केंद्रातून सभोवतालच्या विविध वस्त्यांना किमान 12 ते 13 प्रकारच्या विविध सेवा पुरविल्या जातात. या प्रकारची सेवा देणारी ग्रामीण सेवा केंद्र हे सर्वाधिक परभणी तालुक्यात (मांडाखळी, झरी, टाकळी बोबडे, असोला, जांब, सिंगणापूर, उमरी व साळापुरी) 08 एवढे आढळून येतात. सर्वात कमी ग्रामीण सेवा केंद्र एक हे मानवत तालुक्यात रामेटाकळी हे आहे. परभणीनंतर जिंतूर तालुक्यात या श्रेणीच्या ग्रामीण सेवा केंद्राची संख्या 7 एवढी आढळून येते. त्यात वझर, सावंगी म्हाळसा, आडगाव खंडागळे, वस्सा, आसेगाव, बोरी व कौसाडी या ग्रामीण सेवा केंद्राचा समावेश होतो. यानंतर पालममध्ये 4 ग्रामीण सेवा केंद्र असून ती रावराजूरा, फरकांडा, पेठशिवणी व बनवस ही आहेत. तर सेलु (वालुर, कुप्पा, देवूळगाव गात), पाथरी (केसापूरी, बाभूळगाव, वाघाळ), सोनपेठ (शेळगाव मराठा, कान्हेगाव, नाईकोठा), गंगाखेड (धारासूर, महादपूरी, पिंपळदरी) व पूर्णा (चुडावा, ताडकळस व वझुर) या तालुक्यात प्रत्येकी तीन ग्रामीण सेवा केंद्र आढळून येतात.

*मध्यम सेवा देणारी ग्रामीण सेवा केंद्र :*

अभ्यास क्षेत्रातील एकूण ग्रामीण सेवा केंद्रापैकी 16 ग्रामीण सेवा केंद्र हे मध्यम स्वरुपाची सेवा देणारी ग्रामीण सेवा केंद्र म्हणून ओळखली जातात. जिंतूर तालुक्यात सर्वाधिक 4 (बामणी बु., आंबरवाडी, इटोली व भोगाव) ग्रामीण सेवा केंद्र आहेत. तर सर्वात कमी मानवतमध्ये केकरजावळा, सोनपेठमध्ये उखळी (बु.) तर पालममध्ये चाटोरी या प्रत्येकी एका ग्रामीण सेवा केंद्राचा समावेश होतो. पूर्णा तालुक्यात तीन ग्रामीण सेवाकेंद्र आढळून येतात. त्यात एरंडेश्वर, आहेरवाडी व कातनेश्वर यांचा समावेश होतो. तर परभणी, पाथरी आणि गंगाखेड या तालुक्यात प्रत्येकी दोन ग्रामीण सेवा केंद्राचा समावेश होतो. त्यात परभणी मधील आर्वी व पोखर्णी, पाथरीमधील हादगाव व लिंबा आणि गंगाखेडमधील कोद्री व इसाद या ग्रामीण सेवा केंद्रांचा समावेश होतो.

*न्यूनतम सेवा देणारी ग्रामीण सेवा केंद्रे :*

न्युनतम सेवा देणाऱ्या ग्रामीण सेवा केंद्रात फक्त दोन सेवा केंद्रांचा समावेश होतो. जिंतूरमधील वाघी धानोरा व मानवतमधील कोल्हा या दोन ग्रामीण सेवा केंद्रांचा समावेश न्यूनतम सेवा देणाऱ्या ग्रामीण सेवा केंद्रात होतो. या केंद्रामधून सभोवतालच्या वस्त्यांना अतिशय कमी 8 ते 9 सेवा पुरविल्या जातात. ही ग्रामीण सेवा केंद्र हे दळणवळणाची सुविधा अतिशय कमी

*Indian Streams Research Journal*
Vol.2,Issue.III/*April;* 2012

प्रमाणात असलेल्या प्रदेशात वसलेली आहेत. (तक्ता क्र.2)

***निष्कर्ष :***

अतिउच्च सेवा देणाऱ्या ग्रामीण केंद्रामध्ये 16 ग्रामीण सेवा केंद्रांचा समावेश होतो. ही सेवा केंद्र हे सभोवतालच्या सर्वाधिक वस्त्यांना सर्वाधिक सेवा पुरवित असल्याचे दिसून येते. तसेच ही ग्रामीण सेवा केंद्र हे वाहतूक दळणवळण सुविधांची सुगमता अधिक असलेल्या प्रदेशात आढळून येतात तर उच्च सेवा देणाऱ्या ग्रामीण सेवा केंद्राची संख्या संपूर्ण अभ्यास क्षेत्रात 35 एवढी आहे. या 35 ग्रामीण सेवा केंद्रामधून पुरविल्या जाणाऱ्या सेवा या मध्यम स्वरुपाच्या असून त्या कमी प्रतिच्या असतात. ज्या भागात वाहतूक व दळणवळणाचा तितकासा विकास झालेला नाही अशा प्रदेशात उच्च सेवा देणारी ग्रामीण सेवा केंद्र वसलेली आढळून येतात. तर मध्यम सेवा देणारी ग्रामीण सेवा केंद्राची संख्या 16 एवढी आहे. ज्या प्रदेशात वाहतूकीच्या सुविधा, दळणवळण, संदेशवहनाची कमतरता जाणवते अशाच प्रदेशात ही ग्रामीण सेवा केंद्र आढळून येतात. तर ज्या प्रदेशात वरील प्रकारच्या सुविधा अतिशय कमी प्रमाणात मिळतात. किंबहुना त्या मिळतच नाहीत अशा प्रदेशात फक्त 2 ग्रामीण सेवा केंद्र निर्माण झालेली आहेत. त्यांना न्यूनतम सेवा देणारी ग्रामीण सेवा केंद्र म्हणून ओळखले जाते.

***संदर्भ :***

**1)Davies, W.K.D. (1966) :** 'The Ranking of Service Centers : A Critical Review Transaction and Paper' Institute of British Geographers, No.40, Page 52.
**2)Gopal Kishan and Chanda M.N. (1977) :** 'The System of Service Centers in the Outer Himalayas', Published in Mann Culture and Settlement (Edited by Robert C. Singh K.N. and Rana P.B.) New Delhi.
**3)Kankure, K.B. (1986) :** 'Marathwada : A Study in Settlement Geography', Unpublished Ph.D. Thesis Poona University, Pune.
**4)Mandal, R.B. (1978) :** 'Introduction to Rural Settlement', New Delhi Concept Publishing Co.
**5)Gone, S.H. (2007)** : 'A Study of Geographical Analysis of Market Centres in Parbhani District'. Unpublished Ph.D. Thesis S.R.T.M.U. Nanded.

**Please cite this Article as :** *डॉ.सदानंद गोने ,प्रा.आनंद वळंकीकर* **and** *डॉ.आप्पाराव काळगापुरे* **,** *परभणी जिल्ह्यातील ग्रामीण सेवा केंद्राचे भौगोलिक विश्लेषण* **: Indian Streams Research Journal (April ; 2012)**